MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -६४ | बुधवार दि.२० नोव्हेंबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -64 | WEDNESDAY DT.20 NOVEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4



बीड विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार डॉ. योगेश क्षीरसागर यांनी आपल्या मूळ गावी नवगण राजुरी येथे मतदानापूर्वी ग्रामदैवत गणेशाचे दर्शन घेतले. यानंतर त्यांनी मतदान केंद्रांना भेटी दिल्या. तसेच, बीड शहरातील पोलीस मुख्यालयावरील मतदान केंद्रावर कुटुंबीयांसमवेत मतदानाचा हक्क बजावला. यावेळी माजी नगराध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर, पुजाताई क्षीरसागर उपस्थित होत्या.

# घाटनांदूर सह चोथेवाडी, मुरंबी आदी गावात शरद पवार गटाचे उमेदवार व त्यांच्या गुंडांचा धिंगाणा, व्हीव्ही पॅट मशिन्स ची तोडफोड

## ज्येष्ठ नेते बन्सी अण्णा सिरसाट यांच्या वाहनावर हल्ला, दगडफेक करत दहशत, बन्सी अण्णा बालंबाल बचावले
## धनंजय मुंडे यांची कारवाईची निवडणूक आयोगाकडे तक्रार
## जनतेने पहावे गुंडगिरी आणि दहशत कोण करतंय - धनंजय मुंडे

परळी ।प्रतिनिधी

**शरद पवार गटाच्या उमेदवारांनी, त्यांचे पुत्र व त्यांच्या गुंडांनी थेट दहशत आणि गुंडशाही सुरू केली आहे. अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर, चोथेवाडी, मुरंबी, जवळगाव आदी गावांमध्ये लाठ्या काठ्या व दगड हातात घेऊन थेट मतदान केंद्रावरच हल्ला केला आहे. यावेळी बूथ ताब्यात घ्यायला यश न मिळाल्याने व्हीव्हीपॅट मशीन सह मतदान यंत्रांची तोडफोड करण्यात आली आहे. लाट्या काठ्या व दगड हातात घेऊन मतदान केंद्रात गुंड घुसल्याचे पाहून तेथील मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपला जीव वाचवून पळ काढला.**



हा जमाव इतक्यावरच थांबला नाही तर त्यांनी धनंजय मुंडे यांचे समर्थक जेष्ठ नेते तथा जिल्हा मजूर संस्थेचे अध्यक्ष बन्सी अण्णा शिरसाट यांच्या वाहनावर दगडफेक करत हल्ला केला. यावेळी दगड फेक करत शिरसाठ यांच्या गाडीची तोडफोड करण्यात आली आहे. शेकडोंच्या जमावाने केलेल्या या हल्ल्यातून बन्सी अण्णा शिरसाठ हे बालमबाल बचावले आहेत.

ज्या मतदान केंद्रांवरती आपल्याला मतदान मिळणार नाही अशा प्रकारचा अंदाज येताच त्या मतदान केंद्रांवरती जाऊन हल्ले करण्याचा कार्यक्रम महाविकास आघाडीचे उमेदवार व त्यांचे समर्थक करत आहेत. घाटनांदुर येथे घातलेल्या धुडगुसानंतर तेथील सर्व मशीन निष्क्रिय झाल्या असून सध्या मतदान प्रक्रिया बंद आहे. ही घटना लोकशाहीला काळीमा फासणारी असून या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत धनंजय मुंडे यांनी निवडणूक आयोगाने याचे संपूर्ण फुटेज तपासत तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे. या हल्ल्यातील सर्व गुंडांचा शोध घेऊन त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी असे धनंजय मुंडेंनी म्हटले आहे. दहशत, दादागिरी आणि गुंडशाही असे म्हणत परळीची बदनामी करणारे व प्रत्यक्षात मात्र स्वतःच शेकडोंचा जमाव, हातात लाठ्या-काठ्या घेऊन दगडफेक करत फिरत आहेत, हल्ले करत आहेत, याची निवडणूक आयोगाने व जनतेने देखील तात्काळ दखल घ्यावी व कारवाई करावी, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले आहे.



वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार पुरुषोत्तम वीर यांनी बीड विधानसभे च्या मतदारावेळी बजावला मतदानाचा हक्क सोबत कुटुंबीय दिसत आहेत.

# परळी मतदारसंघातील माय-बाप जनतेने विकासाच्या पाठीशी मतदान रुपी आशीर्वाद उभे करावेत - धनंजय मुंडे

परळी ।प्रतिनिधी

विकास हा आपला पिंड असून मुंडे कुटुंबाच्या दोन पिढ्यांनी परळी मतदारसंघाची सेवा केली आहे व पुढेही शेवटच्या श्वासापर्यंत समर्पित भावनेने विकास हीच जात आणि सेवा हाच धर्म मानून काम करत राहू, परळी मतदारसंघातील तमाम जनता जनार्दनाने विकासाच्या वाटेवर चालणाऱ्या आपल्या भूमिपुत्राच्या पाठीशी मतदान रुपी आशीर्वाद उभा करावेत असे आवाहन परळी विधानसभेचे महायुतीचे अधिकृत उमेदवार धनंजय मुंडे यांनी केले आहे.



राजकारणात सक्रिय झाल्यापासून आजपर्यंत धनंजय मुंडे यांनी विविध माध्यमातून परळी मतदारसंघातील जनतेची शक्य ती सर्व सेवा केलेली आहे. मतदारसंघात मोठे व लहान अनेक विकासाचे प्रकल्प मंजूर केले असून अनेक कामे पूर्ण झाली आहेत तर अनेक कामे प्रगतीपथावर आहेत. प्रगतीपथावर व प्रस्तावित असलेली कामे पूर्ण करण्यासाठी विकासाचा पिंड आणि तो निभावण्याची क्षमता अंगी लागते. त्यामुळे ती क्षमता अंगी असलेल्या उमेदवाराच्या पाठीशीच आपले मतदान रूपे आशीर्वाद उभे करावेत असे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले आहे.

परळी विधानसभा मतदारसंघातील निवडणुकी पहिल्या दिवसापासून राज्यात चर्चेची ठरली. आमदार पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे हे एकत्र असल्यामुळे सोपी आहे अशी वाटणारी लोकसभा निवडणूक वेगवेगळ्या कारणाने अंतिम टप्प्यात अत्यंत चुरशीची ठरली व पंकजाताई मुंडे यांचा अत्यंत अल्पमतांनी अनपेक्षित असा पराभव झाला. मात्र तेव्हापासून काही वरिष्ठ शक्तींनी धनंजय मुंडे यांना टार्गेट केले आहे. याचा उल्लेख धनंजय मुंडे यांनी अनेक वेळा आपल्या भाषणांमधून केला. विरोधकांकडून सातत्याने परळीच्या भूमीची, इथल्या नागरिक - मतदारांची बोगस मतदान करणारे आणि गुंडगिरी करणारे असा सातत्याने अपमान करण्यात आला. याचा रोष इथल्या जनतेच्या मनात दिसून येत आहे. हा रोष इथली जनता आपल्या मतांमधून दाखवून देईल असा विश्वास धनंजय मुंडे यांना आहे.

# पाटोदा व नेकनुर ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा केअर युनिट सुरु करण्याचा प्रस्ताव

## डॉ . अशोक थोरातांकडुन उपसंचालकांना सादर ; डॉ.ढवळेंच्या निवेदनाची दखल :- डॉ.गणेश ढवळे

बीड : बीड तालुक्यातील नेकनुर येथील स्त्री व कुटीर रूग्णालय आणि पाटोदा ग्रामीण रूग्णालय याठिकाणी राष्ट्रीय महामार्गावरील वाढत्या अपघातामुळे ट्रॉमा केअर सेंटरची आवश्यकता असुन तातडीने सुरू करण्यात यावे यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी लेखी निवेदनाद्वारे मागणी करत आंदोलनाचा ईशारा डॉ.अशोक थोरात जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांना दिला होता.याची दखल घेत डॉ.अशोक थोरात यांनी नेकनुर आणि पाटोदा येथील ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्यात यावे याबबतचा प्रस्ताव उपसंचालक आरोग्य सेवा लातुर मंडळ लातुर यांना पाठवला आहे. अहमदपूर ते अहमदनगर आणि पैठण ते पंढरपूर या दोन राष्ट्रीय महामार्गावरील अतिवेगाने वाहन चालवणे त्याचबरोबर उखडलेले रस्ते आणि रखडलेल्या कामांमुळे वाढत्या अपघातांची संख्या पाहता तातडीने उपचार न मिळाल्याने अपघातग्रस्तांना आपला जीव गमावावा लागत असुन तातडीने पाटोदा आणि नेकनुर ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्यात यावे अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे डॉ.गणेश ढवळे, शेख युनुस, स्वप्निल गलधर, निळकंठ वडमारे, विजय लव्हाळे, शेख मुबीन यांनी डॉ.अशोक थोरात जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांना करत दि.१२ डिसेंबर रोजी आंदोलन करण्यात येणार असल्याचा ईशारा दिला होता.त्यापुर्वीच याची दखल घेत डॉ.अशोक थोरात यांनी पाटोदा व नेकनुर ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्यासाठीचा प्रस्ताव उपसंचालक आरोग्य सेवा मंडळ लातुर यांना पाठवला आहे. याठिकाणी ट्रॉमा केअर सेंटर सुरू झाल्यास ब-याच अपघातग्रस्तांना दिलासा मिळणार आहे.






टाकरवनः वचिष्ट आठवे

माजलगांव तालुक्यातील टाकरवण याठिकाणी विधानसभा निवडनुकीचे आज मतदान पार पडत असुन दुपार पर्यत शांततेत मतदान झाले. याच मतदान प्रक्रियत पाच बुथ आसुन या पाचही बुथवर सकाळ पासुन मतदारांनी मतदाना करता गर्दी केली होती यावेळी मतदार बुथ वर पोलिस बंधोबस्त देखील तगडा होता.



आज दुपारी १ च्या सुमारास परळी विधानसभेचे महायुतीचे अधिकृत उमेदवार धनंजय मुंडे यांनी संपूर्ण मुंडे कुटुंबासह आपले जन्मगाव नाथ्रा येथे मतदानाचा हक्क बजावला.यावेळी आ.पंकजाताई मुंडे यांच्यासह धनंजय मुंडे यांच्या मातोश्री रुक्मिणीबाई मुंडे, काकी प्रज्ञाताई मुंडे, माजी खा.डॉ.प्रीतमताई मुंडे, सौ.राजश्रीताई धनंजय मुंडे, ऍड.यशश्रीताई मुंडे, युवक नेते अजय मुंडे, रामेश्वर मुंडे, नाथ्रा गावचे सरपंच अभय मुंडे, डॉ. संतोष मुंडे, बी-बियाणे राज्य समितीचे सदस्य अतुल मुंडे, सुरेश मुंडे, सचिन मुंडे, रामेश्वर तात्या मुंडे यांसह मुंडे कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.यावेळी माध्यमांशी संवाद साधताना धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे यांनी परळीसह बीड जिल्ह्यातील जनतेला मतांचा टक्का वाढवण्याचे आवाहन केले.

# बीड मतदारसंघाला विकासाच्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी पुन्हा सेवेची संधी द्या-आ.संदीप क्षीरसागर

## तुतारी वाजवणारा माणूस चिन्हासमोरील बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करण्याचे केले आवाहन

बीड ।प्रतिनिधी

बीड मतदार संघाला विकासाच्या उंचीवर घेऊन जाण्याची संधी आपल्या सर्वांना आता आली आहे.यापूर्वी तुम्ही दिलेल्या आशीर्वादामुळेच बीड मतदारसंघातील विकासाचे प्रलंबित अनेक प्रश्न आपल्याला मार्गी लावला आहे. विकासकामे पुर्णत्वास नेता आली. आता असाच आशिर्वाद पाठीशी ठेवून दि.२० नोव्हेंबरला मतदान यंत्रावरील अनुक्रमांक ३, तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून मला पुन्हा प्रचंड मतांनी विजयी करा. आपल्या प्रत्येक मताचा आदर करत मी बीड मतदारसंघांला विकासाच्या आणखी उंचीवर घेवून जावून सर्वांगीण विकासासाठी कटिबध्द आहे असे प्रतिपादन आ.संदीप क्षीरसागर यांनी मतदारसंघातील सर्व मतदारांना केले आहे.

बीड मतदार संघाचे राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष व महाविकास आघाडी व मित्रपक्षाचे अधिकृत उमेदवार संदीप क्षीरसागर यांनी म्हटले की,आता आपण सर्वांनी आपला पक्का निर्धार करुन पुन्हा एकदा आपल्या सर्वांच्या विचारांची सत्ता आणण्यासाठी आपले मतदान वाया जाणार नाही, यासाठी तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून विजयी करण्याचे निश्चित करावे. आपले विरोधक इतके दिवस आपल्यावर अनेक आरोप करत आले आहेत. आता तर निवडणूक आहे, मतदारांची दिशाभूल करुन ते आरोप,टिका करत होते पण मतदारसंघातील आपण सुजान मतदार बंधू तुमच्या हक्काचा लोकप्रतिनिधी म्हणून मला ओळखता.त्यामुळे पुन्हा एकदा आपल्या सर्वांची सेवा करण्याची संधी द्यावी.



आपला बीड जिल्हा आणि बीड मतदारसंघ कायम आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या भूमिकेसोबत,विचारांसोबत राहिलेला आहे. संघर्षाच्या स्थितीतही आपण त्यांच्यासोबत कायम राहण्याची भूमिका घेतलेली आहे. म्हणूनच पवारसाहेबांचे हात बळकट करण्यासाठी पक्षाचा व महाविकास आघाडीचा बीडचा अधिकृत उमेदवार म्हणून माझी उमेदवारी आहे. आज २० तारखेला आपण सर्वांनी अनुक्रमांक ३, तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून मला पुन्हा प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले.

# बदामराव पंडिताच्या विजयासाठी तलवाड्याच्या ॲड अनिल हत्ते यांचा शिवसेनेत प्रवेश

राष्ट्रवादी- भाजपला मोठा धक्का

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार बदामराव पंडित यांच्या विजयासाठी संघर्ष योद्धा जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण लढ्याच्या चळवळीत असलेले ड अनिल हत्ते यांनी आपली उमेदवारी मागे घेऊन शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. यामुळे तलवाड्यात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि भारतीय जनता पार्टीला मोठा धक्का बसला आहे.तलवाडा येथील भाजपचे नेते ड सुरेश हत्ते यांनी गेवराई विधानसभा मतदारसंघात आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेला आहे. त्यासोबत त्यांचे पुतणे ड अनिल हत्ते यांनी सुद्धा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. दोघांनीही संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्याकडे उमेदवारी मागितली होती. परंतु जरांगे पाटील यांनी आपण कोणताही उमेदवार विधानसभेच्या निवडणुकीत देणार नाही, त्यामुळे सर्वांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घ्यावेत असे आवाहन केले होते. त्यानुसार ॲडव्होकेट अनिल हत्ते यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. परंतु सुरेश हत्ते यांनी मात्र उमेदवारी अर्ज मागे घेतला नाही. याउलट जरांगे पाटील यांनी महायुतीला पाडण्याचा निर्णय घेतल्यानंतर सुद्धा ड सुरेश हत्ते यांनी महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांना पाठिंबा दिला. यामुळे संतप्त झालेले अनिल हत्ते यांनी थेट शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षामध्ये जाहीर प्रवेश करून



महाविकास आघाडीचे उमेदवार बदामराव पंडित यांच्या विजयासाठी काम करणार असल्याचे जाहीर केले. अचानक घडलेल्या या घटनांमुळे तलवाड्यामध्ये भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला मोठा धक्का बसल्याचे बोलले जात आहे. अनिल हत्ते यांचे बदामराव पंडित यांनी पुष्पहार घालून स्वागत केले या प्रवेशा प्रसंगी गोविंद जोशी, राजेंद्र विटेकर, सरपंच राधाकिसन चाळक, मोहन चाळक, शेख अतिकभाई, शहादेव रोकडे, काकूराम कांबळे यांच्यासह शिवसैनिक बहुसंख्येने उपस्थित होते.



## जिल्हाधिकारी कार्यालयात स्व. इंदिरा गांधी यांची जयंती साजरी

बीड ।प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात स्व. इंदिरा गांधी यांची जयंती आज साजरी झाली. याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) महेंद्रकुमार कांबळे, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख आदींसह अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी स्व. इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच अधिकारी, कर्मचारी यांनीही पुष्प अर्पण करून अभिवादन केले.



समाज कल्याण विभागाच्या वतीने गेवराईत वयोवृद्ध आणि चालता न येणाऱ्या मतदारांसाठी व्हील चेअरची व्यवस्था करण्यात आली होती.

## राज्यात भाजपा महायुतीचं सरकार बहुमताने येणार - आ. पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला विश्वास

परळी रेकॉर्डब्रेक मतांनी विजयी होईल

परळी ।प्रतिनिधी

राज्यभरात मी अनेक ठिकाणी प्रचार सभा घेतल्या, त्याला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. महायुतीच्या सरकारने राबवलेल्या योजनांमुळे लोकांचा विश्वास वाढलाय, त्यामुळे राज्यात भाजपा महायुतीचे सरकार बहुमतांनी येईल असा विश्वास भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा स्टार प्रचारक आ. पंकजाताई मुंडे यांनी आज येथे माध्यमांशी बोलतांना व्यक्त केला. आमची परळीची जागा रेकॉर्डब्रेक मतांनी निवडून येईल असेही त्या म्हणाल्या.

नाथरा येथे मतदानाला जाण्यापूर्वी आ. पंकजाताई मुंडे यांनी निवासस्थानी पत्रकारांशी संवाद साधला त्यावेळी त्या बोलत होत्या. गेल्या तीन तारखेपासून मी प्रचारात आहे. राज्यात वेगवेगळ्या क्षेत्रात सभा घेतल्या, सर्व ठिकाणी चांगला प्रतिसाद मिळाला. महायुती बाबत जनता सकारात्मक आहे. सरकारने जनतेच्या हितासाठी ज्या काही योजना राबवल्या आहेत, त्या यशस्वी ठरल्या आहेत, लोकांचा महायुतीबद्दल विश्वास वाढला



आहेत्यामुळे आमचं सरकार बहुमतांनी पुन्हा सत्तेवर येईल. फेक नरेटिव्हचा या निवडणूकीत परिणाम होणार नाही. २०१९ मध्ये निवडणूक लढवत असताना देखील मी महाराष्ट्रात सभा घेत होते, मला ही निवडणूक फारशी वेगळी वाटली नाही असं त्या एका प्रश्नांच्या उत्तरात बोलताना म्हणाल्या.परळीच्या निवडणुकीबद्दल बोलताना त्या म्हणाल्या, ही निवडणूक सहज व सोपी झाली. महायुतीचे उमेदवार धनंजय मुंडे रेकॉर्डब्रेक मतांनी विजयी होतील असा मला विश्वास आहे.

# गोरगरिबांच्या मदतीला धावून जाणाऱ्या सुरेश धस यांच्या मागे ताकद उभी करा - आ.पंकजाताई मुंडे

**शिट्टी वालो तुम कितना भी माल बाटो....लेकिन सिटी बजने वाली नही है - सुरेश धस**

आष्टी (प्रतिनिधी) स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांनी १९९९ ला सुरेश धस यांच्या हाती कमळ दिले होते. २०१७ मध्ये विधान परिषदेमध्ये भा.ज.प.उमेदवार म्हणून सुरेश धस यांना विजयी केले. आता पुन्हा २०२४ मध्ये सुरेश धस यांच्या हाती कमळ देत आहे. सदैव गोरगरिबांच्या मदतीला धावून जाणाऱ्या सुरेश धस यांच्या मागे आपली ताकद उभी करा आणि त्यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा असे आवाहन भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी केले.

आष्टी विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टी, शिवसेना रिपाई (आठवले गट )आणि मित्र पक्षाच्या महायुतीचे उमेदवार सुरेश धस यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेमध्ये त्या बोलत होत्या.

सभेच्या व्यासपीठावर माजी आमदार साहेबराव दरेकर, बीड जिल्हा भाजपा अध्यक्ष शंकर देशमुख, महाराष्ट्र राज्याचे अनुसूचित जाती मोर्च्याचे उपाध्यक्ष वाल्मीक निकाळजे, शिरूर तालुका भाजपाचे अध्यक्ष सुरेश उगलमुगले, आष्टीचे नगराध्यक्ष जिया बेग, नगराध्यक्ष रोहिदास गाडेकर, शिरूरचे माजी सभापती बाबुराव केदार, महाराष्ट्र राज्य भाजप युवा मोर्चाचे सचिव अभिजीत शेंडगे, समाजसेवक विजय गोल्हार, कडा मार्केट कमिटीचे सभापती रमजान तांबोळी, पाटोदा मार्केट कमिटीचे सभापती किरण शिंदे पाटील, तात्याराव हुले पाटील, किरण बांगर आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ. पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, सुरेश धस हे उमेदवार अत्यंत कष्ट करणारे, अनेक वर्ष काम करणारे, जनतेचे प्रश्न माहीत असणारे व्यक्तिमत्व असून मी ग्रामीण विकास मंत्री असताना त्यांनी बीड जिल्हा परिषद भाजपाच्या ताब्यात दिली. त्यावेळी स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे हे बेरजेचे राजकारण करत असतात. मी सुरेश धस यांना सोबत घेऊन गुणाकार करण्याचे राजकारण केले. बीड जिल्ह्यामध्ये चांगलं कष्ट करणार, चांगलं नेतृत्व पुन्हा भारतीय जनता पार्टीमध्ये घेऊन कामाचं गणित मांडलं आणि जिल्हा परिषदे वर भारतीय जनता पार्टीचा झेंडा फडकवला. स्वर्गीय




लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी आणि आम्ही रक्ताचे पाणी करून कमळ फुलवले आहे ते कमळ मुंडे साहेबांनी सुरेश धस यांचे हाती दिले आणि मी आज परत ते सुरेश धस यांच्या हाती सुपूर्द करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हेच कमळ हाती घेऊन सलग तीन वेळा पंतप्रधान होण्याचा मान मिळवला असून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस हे देखील हेच कमळ हाती घेऊन सलग पाच वर्ष मुख्यमंत्रीपदी राहिले. या निवडणुकीमध्ये देखील महाराष्ट्र राज्यामध्ये भारतीय जनता पार्टी शिवसेना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या महायुतीचे सरकार येणारच आहे. बीड जिल्ह्यात देखील भारतीय जनता पार्टीचे दोन्ही आमदार निवडून येणार आहेत आणि बीड जिल्ह्याला पुन्हा एकदा महाराष्ट्र राज्यात चांगले दिवस येणार आहेत असे वातावरण दिसून येत आहे. संपूर्ण बीड जिल्ह्याची मनस्थिती चांगली आहे. महायुतीचे सर्व उमेदवार निवडून येतील. सुरेश धस हे गोरगरिबांना सतत मदत करणारे, कष्ट करणारे, शेतकऱ्यांचे प्रश्न माहीत असणारे उमेदवार आहेत. लोकांच्या दुःखावर फुंकर घालून त्यांच्या पाठीवर हात ठेवून बोलणारं हे व्यक्तिमत्व असून त्यांच्या एवढे कष्ट कोणीही घेऊ शकत नाही हे संपूर्ण जिल्ह्याने पाहिले आहे. पुढे म्हणाल्या की, आष्टी विधानसभा मतदारसंघामध्ये स्व. लोकनेते गोपीनाथराव मुंडे आणि आमच्या राजकीय घराण्याला मानणारा मोठा मतदार वर्ग आहे. त्यामुळे आता सर्व कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आवाहन करून त्या म्हणाल्या की, माझी आणि सुरेश धस यांची शक्ती एकत्र येऊन राजकीय वज्रमुठ बांधली जाणार आहे. त्यामुळे बीड जिल्ह्याला पुन्हा चांगले दिवस येतील. ही निवडणूक महत्त्वाची आहे. त्यामुळे धस यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा असे आवाहनही त्यांनी शेवटी केले.

आष्टी विधानसभेचे उमेदवार सुरेश धस यांनी यावेळी बोलताना महायुती शासनाचे कृषी विभागाचे अनेक निर्णय चांगले असून मागेल त्याला शेततळे, मागेल त्याला फळबाग, फळबागेसाठी शंभर टक्के अनुदान, ईतर पिकांसाठी ८० टक्के अनुदान ६.५० लक्ष रुपये किमतीचे शेततळे, गोपीनाथराव मुंडे अपघात विमा, शेतीसाठी बी बियाणे वाटप, सामूहिक कांदा चाळ, व्यक्तिगत लाभाच्या विहिरी, या मनरेगाच्या योजनां मधून शेतकऱ्यांना मोठा फायदा झालेला आहे. खुंटेफळ साठवण तलावाच्या सर्वेक्षणापासून पाईपलाईन पर्यंतची सर्व कामे माझ्या पत्रावर मंजूर झाले असून खुंटेफळ साठवण तलावातील पाणी रोडागिरी डोंगरावरून मातकुळी पर्यंत जाणार असल्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे जीवनमान बदलणार आहे. या कामाचे श्रेय इतर कोणीही घेऊ शकत नाही. सीना मेहेकरी योजनेचे देखील माझ्याच काळात ९७ टक्के काम झाले होते. या पुढील कामांमध्ये घरकुलाच्या सर्व योजनांमधील जास्तीत जास्त घरकुलांना मंजुरी देऊन गरजू लोकांना हक्काचे छत पुरवण्याचा प्रयत्न करणार आहे.

शिरूर आणि पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी गोदावरी खोऱ्यातील पश्चिम वाहिनीचे ५५ टीएमसी पाणी येणार असून मराठवाड्याच्या हक्काचे पाणी मिळवण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहे असे सांगून आष्टी पाटोदा तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस गाळप करण्यासाठी इतर कोणाच्याही दारात जावे लागणार नाही यासाठी आपल्या हक्काचा खासगी साखर कारखाना उभारणीसाठी काम सुरू असून लवकरच हा साखर कारखाना उभा राहणार आहे. त्या ठिकाणी वीज निर्मिती आणि इथेनॉल निर्मिती देखील होणार असल्यामुळे शेतकऱ्यांची सोय आणि रोजगार देखील मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होणार आहेत असे सांगत समोरील प्रतिस्पर्धी उमेदवार असलेले राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे बाळासाहेब आजबे यांच्यावर घणाघात करताना ते म्हणाले की, महाविकास आघाडी सरकारच्या काळात धस कुटुंबीयांवर गुन्हे दाखल करा, त्यांना जेलमध्ये घाला, यासाठी त्यांनी भरपूर प्रयत्न केले आणि असीम सरोदे सारख्या मोठ्या मानधनाच्या वकिलाला माझ्याविरुद्ध पत्रकार परिषद घ्यायला लावली परंतु त्यांनी हे पण सांगावे की दादेगाव येथील श्रीराम देवस्थानाची ७०० एकर जमीन शिराळ मधील लोकांकडे असून त्यातली सर्वात जास्त ३०० एकर जमीन आ. बाळासाहेब आजबे यांच्या कुटुंबाकडे आहे हे पण त्यांनी जनतेला सांगायला हवे होते.

# बदामराव पंडित यांचा विजय रोखणे विरोधकांना आता शक्य नाही - माजी आ सुनील धांडे

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघामध्ये गोरगरिबांनी सामान्य माणसाला बदामराव पंडित हे कायम आपले वाटतात. कोणतीही अडीअडचण असली तरी त्यांच्याकडे जाऊन आपण ती सांगू शकतो आणि सोडवून घेऊ शकतो हा विश्वास लोकांना वाटतो. विरोधकांनी कितीही घाणेरडे राजकारण केले आणि अफवा पसरवल्या तरी सुद्धा यावेळी बदामराव पंडित यांचा विजय रोखणे हे विरोधकांना आता शक्य नाही असा ठाम विश्वास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे गेवराई मतदार संघाचे समन्वयक माजी आमदार सुनील धांडे यांनी व्यक्त केला आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार बदामराव पंडित यांच्या प्रचारासाठी माजी आमदार सुनील धांडे यांनी सिरसदेवी सर्कल मधील अनेक गावांना भेटी दिल्या. यावेळी त्यांच्यासमवेत उमेदवार बदामराव पंडित हेही उपस्थित होते. श्रीदेवीच्या नांदेड चौक रुई कॉर्नर येथे झालेल्या बैठकीत बोलताना माजी आमदार सुनील धांडे म्हणाले की, २४ तास गोरगरिबांच्या गराड्यात राहून त्यांची काम करत असलेले बदामराव पंडित हे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या अत्यंत विश्वासू आणि निकटवर्तीय उमेदवार आहेत. त्यांना मतदारसंघातल्या जनतेची जेवढी खंबीर साथ आहे तेवढीच पक्षाची सुद्धा साथ आहे. महायुतीचे उमेदवार हे खोटी आश्वासन देऊन जनतेला फसवण्याचे काम करत आलेले



आहेत. केवळ दादागिरी करून धमक्या दिल्याने लोकांची मते मिळत नसतात हे गेल्या ३० वर्षात गेवराईकरांनी दाखवून दिले आहे. जी माणसं आमदार व्हायच्या अगोदरच लोकांना राष्ट्रीय कार्यक्रम करू असं म्हणत धमक्या देत आहेत त्यांना गेवराईतली जनता कधीच भीक घालणार नाही असे सांगून सुनील धांडे म्हणाले की बदामराव पंडित हे खमक्या नेतृत्व आहे ज्यांनी गरिबावर अन्याय करून दादागिरी करण्याचा प्रयत्न केला ती दादागिरी मोडूत काढण्याचे काम फक्त बदामराव पंडित यांनीच केले आहे त्यामुळेच गोरगरिबांना त्यांच्यावर विश्वास आहे. २३ नोव्हेंबर नंतर बदामराव पंडित हे मोठ्या मताधिक्याने विजयी झालेले गेवराईचे आमदार असतील आणि पराभूत झालेले विरोधक तालुका सोडून बीड नाहीतर पुण्याला जाऊन राहतील असेही सुनील धांडे म्हणाले.

याप्रसंगी माजी सभापती पंढरीनाथ लगड, अशोक नांदे, नवनाथ पवार, विठ्ठल रुचके, राजाभाऊ रोमन, बंडू पटाईत, दामू मोरे, बाळू नांदे, गाडे पाटील कोळगावकर, संभाजी नवले, गणेश घोंगडे, साईनाथ आडगळे

## लाडक्या बहिणी आणि जागरूक मतदार बीड विधानसभेवर डॉ. योगेश क्षीरसागर यांनाच विजयी करणार - सौ.सारिका क्षीरसागर

बीड (प्रतिनिधी)

बीड विधानसभा मतदारसंघात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ तब्बल ९८ हजार महिलांना मिळाला आहे. या लाडक्या बहिणी आणि बीड मतदार संघातील सुजाण जागरूक मतदार हा डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. लाडक्या बहिणींचा मिळत असलेला प्रचंड प्रतिसाद पाहता महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर हे मोठ्या मताधिक्याने विजय होतील असा विश्वास डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे.

लोकनेत्या स्व.केशरकाकू यांच्या सामाजिक, राजकीय कार्याचा वसा आणि वारसा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, माजी नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी उत्तमरित्या सांभाळला आहे. हेच क्षीरसागर कुटुंबाचे कार्य पुढे नेण्याचा प्रयत्न डॉ.योगेश हे करत आहेत. ५ वर्षात विरोधकांना जे जमले नाही, ते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी कुठलेही महत्त्वाचे पद नसताना अवघ्या एकाच वर्षात साध्य करून दाखवले. आमदार फंडाइतका निधी काही महिन्यातच खेचून आणला. त्यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघात स्वयंरोजगार, अविरत आरोग्य सेवा, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम, महिला, तरुण, शेतकऱ्याच्या योजना तळागाळातील व्यक्तींपर्यंत पोहचविणे, असे अनेक उपक्रम राबविले. त्यांनी कधीही जातपात, धर्म या मुद्द्याकडे लक्ष दिले नाही. २४ तास लोकांमध्ये राहून विकासाच्या मुद्द्यावर मते मागितली आहेत. बीड विधानसभा मतदारसंघात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ तब्बल ९८ हजार महिलांना मिळाला आहे, हा लाभ प्रत्येक महिलेपर्यंत पोहोचविण्यासाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, भाजप, शिवसेना, रिपाइं अशा महायुतीच्या सर्व मित्र पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी प्रचंड मेहनत घेतलेली आहे. त्यामुळे लाडक्या



बहिणींचा प्रचंड प्रतिसाद पाहता बीड विधानसभा मतदारसंघातून डॉ.योगेश क्षीरसागर हे मोठ्या मताधिक्याने विजय होतील. त्यांना लाडक्या बहिणीच विधानसभेत पाठवतील, असा विश्वास डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, डॉ.योगेश क्षीरसागर यांना मतदान करून बीड मतदारसंघाला विकासाच्या वाटेवर आणण्याची संधी माय-बाप जनतेने द्यावी, असे आवाहन डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी दिले आहे.

# निवडणुकीत जप्त केलेल्या पैशांच पुढे काय होतं? जाणून घ्या



निवडणूक काळात बऱ्याचदा मोठ्या प्रमाणात रोकड जप्त केली जाते. प्रत्येकवेळी जप्त केलेली रक्कम निवडणुकीशी संबंधित असेलच असं नाही. निवडणूक आयोगाने नेमलेल्या पथकांकडून जी रक्कम जप्त करण्यात येते, त्याचं पुढे काय होतं? ही रक्कम परत कशी मिळते? हा पैसा बेकायद असेल तर त्याचं पुढे काय होतं? ही सगळी प्रोसेस समजून घ्या.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस आहे. संध्याकाळी ६ वाजता प्रचार संपेल. आज अखेरच्या क्षणापर्यंत सर्वच राजकीय पक्ष, नेत, उमेदवार आणि कार्यकर्ते आपल्यापरीने जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करतील. आपल्या पक्षाचा विचार, धोरण आणि निवडणुकी जिंकल्यानंतर काय करणार? तो अजेंडा मतदारांना पटवून देण्याचा प्रयत्न करतील. पुन्हा सत्ता मिळवण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधी पक्ष सत्तेत बसण्यासाठी मतदारांवर प्रभाव टाकण्याचा पुरेपूर प्रयत्न करतील. महाराष्ट्रात केंद्रीय निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोंबरला विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. २२ ऑक्टोंबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली. २९ ऑक्टोंबर उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत होती. महाराष्ट्रातील विधानसभेच्या २८८ जागांसाठी ७ हजार ०७८ जणांनी अर्ज दाखल केले होते. त्यातील २ हजार ९३८ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. आता एकूण ४ हजार १४० उमेदवार रिंगणात आहेत. महाराष्ट्रात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी मुख्य लढत आहे. २० नोव्हेंबर म्हणजे बुधवारी मतदान पार पडेल. त्यानंतर तीन दिवसांनी म्हणजे २३ नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होतील.

निवडणूक आयोगाने निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्यानंतर आदर्श आचारसंहिता अस्तित्वात येते. निवडणुका पारदर्शक आणि निष्पक्ष पार पडाव्यात, यासाठी ही आदर्श आचारसंहिता असते. निवडणूक काळात निवडणूक आयोगाकडे अनेक विशेष अधिकार असतात. उमेदवाराच्या निवडणूक खर्चापासून ते प्रचार रॅली मिरवणूक, प्रचार सभा, झेंडे, बॅनर लावण्यासाठी नियमावली असते. यातील एकाही गोष्टीच उल्लंघन झाल्यास ते आचारसंहितेच उल्लंघन मानलं जातं. निवडणूक काळात अनेक राजकीय पक्ष, उमेदवार प्रतिस्पर्धी पक्ष, उमेदवार यांच्याविरोधात आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचा आरोप करतात. त्यासाठी निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करतात. कुठलीही निवडणूक असो, लोकसभेची, विधानसभेची, जिल्हा परिषदेची किंवा ग्राम पंचायतीची एक आरोप सर्रास होतो, तो म्हणजे पैसे वाटपाचा. महाराष्ट्रात या विधानसभा निवडणुकी दरम्यान वेगवेगळ्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात रोकड पकडण्यात आली आहे. रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. निवडणूक काळात जप्त होणाऱ्या या पैशाच पुढे काय होतं? हा अनेकांच्या मनात प्रश्न आहे.

कुठल्या कलमातंर्गत गुन्हा?

निवडणुकी दरम्यान मतदारांना पैशाच आमिष दाखवणं, भेटवस्तू, दारु, मोफत जेवण किंवा मतदारांना धमकावण्यासाठी पैसा-बळाचा वापर हे खझउ च्या कलम १७१ ख ए आणि १७२ ग अंतर्गत गुन्हा आहे. त्याशिवाय लोक प्रतिनिधित्व कायदा १९५१ च्या कलम १२३ अंतर्गत सुद्धा हे भ्रष्ट आचरण मानलं जातं.

निवडणुकीच पावित्र्य कायम ठेवण्यासाठी निवडणूक आयोगाने २०१५ साली डजझ आणली. या डजझ अंतर्गत निवडणूक प्रक्रियेदरम्यान निवडणूक क्षेत्रात अत्याधिक प्रचार खर्च, पैसा वाटप, भेटवस्तू वितरण, बेकायद शस्त्र, दारु पाजणं अशा अनैतिक कृत्यांना पायाबंद घालण्यासाठी, रोखण्यासाठी भरारी पथकांची स्थापना केली.

डजझ नुसार प्रत्येक विधानसभा/लोकसभा क्षेत्रात तीन किंवा त्यापेक्षा जास्त भरारी पथकं असली पाहिजेत. निवडणुकीच्या तारखांची घोषणा झाल्यापासून भरारी पथकाचं काम सुरु होतं. मतदान संपेपर्यंत भरारी पथकाचं काम चालंत.

भरारी पथकाचं काम काय असतं?

आदर्श आचार संहिता उल्लंघन प्रकरणात प्राप्त होणाऱ्या सर्व तक्रारींवर भरारी पथकाकडून कारवाई केली जाते.धमकावणं, असामाजिक तत्व, मदिरा, शस्त्र, दारुगोळा आणि मतदारांना लाच देण्यासाठी मोठ्या प्रमाणात पैशाची वाहतूक करणं या सर्व तक्रारींची भरारी पथकाकडून दखल घेतली जाते.उमेदवार आणि राजकीय पक्षांकडून निवडणुकी संबंधी प्राप्त होणाऱ्या सर्व तक्रारीवर भरारी पथक कारवाई करतं.निवडणुकीच्या घोषणेनंतर राजकीय पक्षांकडून आयोजित होणाऱ्या प्रमुख सभा, सार्वजनिक बैठका आणि अन्य मोठ्या कार्यक्रमांची व्हिडिओग्राफी केली जाते.संवेदनशील मतदारसंघात तिथल्या गरजेनुसार भरारी पथकांची तैनाती केली जाते. नियमानुसार, जेव्हा कधी दारु आणि पैसा वाटपाची तक्रार मिळते, भरारी पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचतं. तक्रारीनुसार तिथे रोख रक्कम आढळली, तर ताब्यात घेतली जाते. भरारी पथकाकडून प्रत्यक्षदर्शींची साक्ष नोंदवली जाते. पंचनामा केला जातो.

या संपूर्ण प्रक्रियेच व्हिडिओ रेकॉर्डिंग

जप्त केलेल्या रोख रक्कमेसंबंधी रिपोर्ट मॅजिस्ट्रेटद्वारे राज्य मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला पाठवला जातो. या संपूर्ण प्रक्रियेच व्हिडिओ रेकॉर्डिंग केलं जातं. या प्रकरणात लाच देणारा आणि घेणारा, ज्याच्याकडून ती रोकड जप्त करण्यात आलीय, त्या विरोधात भरारी पथकाच्या अधिकाऱ्याकडून एफआयआर नोंदवला जातो.

५० हजार रुपयापेक्षा अधिक रक्कम आढळली, तर

तपासणी दरम्यान उमेदवार त्याचा एजंट किंवा पार्टी कार्यकर्ते असलेल्या वाहनात ५० हजार रुपयापेक्षा अधिक रक्कम आढळली, गाडीत पोस्टर, निवडणुकीसंबंधी साहित्य, ड्रग्स, दारु, शस्त्र, १० हजार रुपयापेक्षा अधिक मुल्य असलेल्या वस्तू ज्यांचा वापर मतदारांना प्रलोभन देण्यासाठी करण्यात येणार आहे, ते ती रोख रक्कम, वस्तू जप्त केल्या जातात. तपासणी आणि जप्तीच्या या संपूर्ण घटनाक्रमाचा व्हिडिओ बनवला जातो.

स्टॅटिक मॉनिटरिंग टीम काय करते?

गाडीमध्ये १० लाख रुपयापेक्षा अधिक रोख रक्कम सापडली, कुठल्या गुन्ह्याशी, कुठल्या उमेदवारांशी, पक्ष पदाधिकाऱ्यांशी संबंध नसल्यास स्टॅटिक मॉनिटरिंग टीम ही रक्कम जप्त करणार नाही. स्टॅटिक मॉनिटरिंग टीम आयकर कायद्यातंर्गत कारवाईसाठी आयकर विभागाला माहिती देईल. चौकशी दरम्यान गुन्ह्याचा संशय आल्यास कार्यकारी मॅजिस्ट्रेटच्या उपस्थितीत सीआरपीसी तरतुदीनुसार स्टॅटिक मॉनिटरिंग टीम रोख रक्कम आणि अन्य वस्तु जप्त करेल. त्यानंतर डडढ चे प्रभारी पोलीस अधिकारी न्यायालयात २४ तासांच्या आत ऋखठ नोंदवतील.

जप्त केलेली रक्कम परत कशी मिळते?

सर्व सामान्य जनता आणि योग्य माणसांना असुविधेपासून वाचवण्यासाठी त्यांच्या तक्रारीच निवारण करण्यासाठी जिल्हा स्तरावर एक समिती असते. या समितीत जिल्ह्यातील तीन अधिकारी असतात. ही समिती पोलीस, एसएसटी किंवा भरारी पथकाने केलेल्या जप्तीच्या प्रत्येक प्रकरणात तपास करते. समितीला तपासात आढळून आलं की, कुठलीही तक्रार दाखल नाहीय,. ही जप्ती उमेदवार, राजकीय पक्ष किंवा निवडणूक प्रचाराशी संबंधित नाहीय, तर मग जप्त केलेली रक्कम रिलीज करण्यासाठी स्पीकिंग आदेश जारी केला जातो. समिती संपूर्ण विषायाचा आढावा घेऊन आदेश देते.

आयकर विभागाच्या अधिकाऱ्याला का कळवावं लागतं?

ज्यांची रक्कम आहे, त्यांना परत करताना ती १० लाख रुपयापेक्षा जास्त असेल, तर रक्कम रिलीज करण्याआधी आयकर विभागाच्या नोडल अधिकाऱ्याला सूचना केली जाते. पैसा, वस्तुंच्या जप्ती प्रकरणात ही रिटर्निंग अधिकाऱ्याची जबाबदारी असेल की, त्याने हे सर्व विषय अपीलीय समितीसमोर सादर करावेत. अपीलीय समितीच्या आदेशानुसार रोख रक्कम आणि किंमती वस्तू रिलीज होतात.

आयकर विभागाची एन्ट्री कधी होते?

पकडलेली रक्कम निवडणुकीशीच संबंधित आहे हे लगेच सिद्ध करणं अवघड असतं. मग, अशावेळी आयकर विभागाची याची माहिती दिली जाते. आयकर विभाग मग आपला तपास सुरु करतो.

भरारी पथकाच्या टीममध्ये कुठले अधिकारी असतात?

बेकायदा पैसा, वस्तुंचा वापर रोखण्यासाठी टीममध्ये वरिष्ठ मॅजिस्ट्रेट, वरिष्ठ पोलीस अधिकारी, व्हिडिओग्राफर आणि काही सशस्त्र जवान असतात.

निवडणुकीसाठी पैसा वापरणार हे कोर्टात सिद्ध झाल्यानंतर काय?

काही प्रकरणात निवडणुकीसाठी पैशांचा वापर होणार हे कोर्टात सिद्ध झाल्यास तो पैसा जिल्हा कोषागरता जमा केला जातो.

मुंबईसह महाराष्ट्रात आतापर्यंत किती मालमत्ता जप्त


महाराष्ट्रात निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यापासून आतापर्यंत विविध भागातून कोट्यवधी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. यामध्ये बेकायद पैसा, दारु, अमली पदार्थ आणि मौल्यवान धातू यांचा समावेश आहे. राज्यात आतापर्यंत एकूण ४९३ कोटी ४६ लाखाची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. मुंबई उपनगरातून १३८ कोटी १९ लाखाची तर मुंबई शहरातून ४४ कोटी ९५ लाखांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. १२ नोव्हेंबरपर्यंतचे हे आकडे आहेत. अशा अनैतिक गोष्टीतून निवडणूक, मतदान प्रभावित होऊ नये, निष्पक्ष निवडणूक व्हावी यासाठी निवडणूक आयोगाने राज्यात मोक्याच्या ठिकाणी तपासणी नाके उभारले आहेत.

## विजयसिंह पंडित यांना विजयी करा – माजी नगरसेवक शेख शफीक, ईल्यास टेलर



बीड (प्रतिनिधी)

माजी मंत्री शिवाजीराव ( दादा) पंडित यांचा परिवार हा सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन चालणारा समाज आहे. राजकारण करत असताना त्यांनी कधीही दुजाभाव केला नाही. सर्व जाती धर्माच्या लोकांना वेगवेगळ्या पदावर बसून त्यांनी सर्वधर्मसमभाव जपला आहे. बाजार समितीच्या सारख्या मोठ्या संस्थेच्या सभापतीपदी मुजीब पठाण सारख्या साध्या कार्यकर्त्याला बसून त्यांनी मुस्लिम समाजाला न्याय दिला आहे. या शिवछत्र परिवारातील उमेदीचे नेतृत्व विजयसिंह पंडित उमेदवार म्हणून उभे आहेत. त्यांना विक्रमी मताने विजयी करण्याचे आवाहन माजी नगरसेवक शेख शफीक, माजी सभापती ईल्यास टेलर आणि सय्यद जावेद (टाटा) यांनी केले आहे.





आज विधानसभा निवडणुकीसाठी लोकशाहीचा उत्सव होत आहे माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी नवगण राजुरी येथे श्रीगणेशाचे दर्शन घेऊन आपला मतदानाचा हक्क बजावला



जिल्हा परिषद सदस्य ड प्रकाश कवठेकर विधानसभा निवडणूक मतदानाचा हक्क बजवताना परिवार सोबत...

## केज विधानसभा मतदार संघात ३ लाख ८७ हजार २२१ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

केज / प्रतिनिधी

**२० नोव्हेंबर रोजी केज विधान सभेच्या निवडणुकीसाठी सुरक्षा दलाचा प्रचंड बंदोबस्त असून पोलिसांच्या मदतीला सीमा सुरक्षा दल, दंगल नियंत्रक पथक तैनात करण्यात आले आहेत. आज सर्व कर्मचारी हे मतदान केंद्रावर साहित्य घेवून हजर होणार आहेत.२३२-केज (अ.जा.) विधान सभा मतदार संघाच्या सार्वत्रिक निवडणूक २० नोव्हेंबर रोजी होत आहे. या मतदार संघात केज, अंबाजोगाई आणि बीड तालुक्याचा समावेश आहे. के ज तालुक्यातील सहा, अंबाजोगाई तालुक्यातील दोन तर बीड तालुक्यातील एक जिल्हा परिषद गटाचा समावेश आहे. केज मतदार संघात एकूण ३ लाख ८७ हजार २२१ एवढी मतदार संख्या आहे. त्या पैकी २ लाख २६ हजार २० पुरुष तर १ लाख ८४ हजार ५९५ महीला आणि ६ तृतीय पंथी मतदार आहेत.**

या मतदार संघात ४२० मतदार केंद्र असून त्या पैकी २१० मतदान केंद्रावर ही सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. तसेच१८ मतदान केंद्र हे संवेदनशील मतदान केंद्र आहेत.दि. १९ नोव्हेंबर रोजी सर्व कर्मचारी हे साहित्य घेवून मतदान केंद्रावर पोहोचणार आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे हे आहेत. तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अंबाजोगाईचे तहसीलदार विलास तरंगे, केजचे तहसीलदार राकेश गिड्डे, गट विकास अधिकारी प्रियांका टोंगे आणि समृद्धी दिवाणे त्यांना मदत करीत आहेत.

- आज साहित्यासह कर्मचारी मतदान केंद्रावर होणार हजर
- ४२० मतदान केंद्रा पैकी २१० मतदान केंद्रावर सीसीटिव्ही कॅमेऱ्यांची नजर
- १८ मतदान केंद्र संवेदनशील



**पोलीस, सीमा सुरक्षा दल, दंगल नियंत्रक पथक आणि गृह रक्षक दलाचा फौज फाटा असणार मतदान केंद्रावर तैनात**




### कर्मचारी

मुख्य निवडणूक अधिकारी :- १
सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी :- ४
मतदान अधिकारी - १६८०
झोनल अधिकारी - ८२
मतदान केंद्र
एकूण मतदान केंद्रे :- ४२०
संवेदनशील मतदान केंद्र :- १८

### सीसीटिव्ही कॅमेऱ्याच्या निगराणी खाली

असलेली मतदान केंद्र :- १८
पाळणाघर :- १३
सखी मतदान केंद्र :- १
दीव्यांग मतदान केंद्र :- १
निवडणूकीसाठी लागणारे साहित्य
कंट्रोल युनिट :- ४२० --८२ राखीव
बॅलेट युनिट :- ८४०--८२ राखीव
व्हीव्हीपॅट :- ४२०--८२ राखीव
सुरक्षा यंत्रणा
सहाय्यक जिल्हा पोलीस अधीक्षक :- १
डी वाय एस पी :- ४
पोलीस निरीक्षक :- १
सहाय्यक पोलीस निरीक्षक :- २
पोलीस उपनिरीक्षक :- १०
पोलीस कर्मचारी :- ४०३
सीमा सुरक्षा दल :- एक कंपनी
दंगल नियंत्रण पथक :- एक प्लाटून
आणि गृहरक्षक दलाचे जवान



## योग्य दिनचर्येने ठेवा दूर मासिक पाळीतील वेदना

(पुणे) मासिक पाळी ही एक नैसर्गिक प्रक्रिया असते. मात्र, या काळात होणाऱ्या वेदना असह्य होतात.रुटीन पाळणेही शक्य नसते. आहारात गुळ-शेंगदाणे, काळे मणुके यांचा समावेश, दररोज किमान २० मिनिटे योगासने करणे, जंक फूड टाळणे, अशा गोष्टींतून मासिक पाळीतील वेदना दूर ठेवण्यास मदत होऊ शकते.

मासिक पाळीत कंबरदुखी, ओटीपोट दुखणं, छाती जड वाटणं, अस्वस्थता, सतत मूड बदलणं आणि चिडचिड होणं, असे त्रास होतात. याशिवाय काही महिलांना पोटदुखीचा फार त्रास होतो. त्यामुळे अनेक जणी वेदनाशामक गोळी घेतात. त्याचे भविष्यात वाईट परिणाम होतात. त्यामुळे महिलांनी या काळात शक्य तितक्या कमी प्रमाणात पेनकिलर घ्यावी. ही गोळी घेण्यापेक्षा काही घरगुती उपाय केल्यास वेदनेपासून आराम मिळतो. पोटदुखीपासून सुटका मिळविण्यासाठी आहारही महत्त्वाचा आहे. आहारात मनुका, केशर आणि तूप यांसारख्या गोष्टींचा समावेश होतो. त्यांच्या मदतीने मासिक पाळीच्या वेदनांपासून काही प्रमाणात आराम मिळतो. मनुका आणि केशरच्या सेवनाने वेदना कमी होतात. यासाठी एका वाटीत काळ्या मनुका आणि दुसऱ्यामध्ये केशर टाकावे. सकाळी उठल्यावर त्याचे सेवन करावे. त्यामुळे पीरियड क्रॅम्प्स आणि ब्लोटिंगच्या समस्येपासून आराम पडू शकतो. तसेच बद्धकोष्ठता कमी करण्यास आणि शरीरातली लोहाची कमतरता भरून काढण्यासही याचा उपयोग होतो.

मासिक पाळीत ही घ्या काळजी

– मासिक पाळीत जड वस्तू उचलणे, प्रवास करणे टाळा – गरम फडक्याने किंवा गरम पाण्याच्या पिशवीने पाठ आणि ओटीपोट शेका – पाठ आणि ओटीपोटाला हलका मसाज करा – गरम पाण्याने आंघोळ करा – आवश्यकता वाटल्यास झोप घ्या – खारट आणि कॅफेन असलेले पदार्थ टाळा – नियमित व्यायाम करा – पाळीदरम्यान हलका आणि पोषक आहार घ्या पाळी वेदनेची कारणे –


पाळी येते तेव्हा गर्भाशय आकुंचन पावते. ज्यामुळे गर्भाशयाच्या भिंतींना असणारे अस्तर सुटून येते. हे प्रोस्टाग्लान्डिन्स सारख्या हार्मोन्समुळे घडते. हे अस्तर सुटले की, मासिक पाळी सुरू होते. जर गर्भाशय खूप जोरात आकुंचन पावले तर त्याचा ताण रक्तवाहिन्यांवर येतो आणि गर्भाशयाकडे जाणारा रक्तप्रवाह कमी होतो आणि वेदनांना सुरुवात होते. पाळी वेदनेमुळे अतिरक्तस्रावाचा त्रासही होऊ शकतो. ३० टक्के महिलांना मासिक पाळीच्या काळात अतिवेदना होतात. त्यांना उपचारांची गरज असते. यासाठी काही नैसर्गिक उपाय नसतात. अशावेळी स्वतःहून औषधे न घेता तज्ज्ञांकडून तपासणी करून औषधे घ्यावीत.- डॉ. ज्योती जाधव , स्त्रीरोगतज्ज्ञ वाघोली, पुणे सध्याच्या बदलत्या जीवनशैलीमुळे महिलांमध्ये मासिक पाळीदरम्यानच्या वेदना वाढू लागल्या आहेत. या टाळण्यासाठी मासिक पाळीच्या आधी बस्ती घेतल्यास बराच फरक पडतो. त्यामुळे वात कमी होतो. नियमित योगासने केल्यासही वेदना कमी होतात.- डॉ. किरण औटी, स्त्रीरोग तज्ज्ञ वाघोली, पुणे.



जिल्हा परिषद सदस्य ड प्रकाश कवठेकर विधानसभा निवडणूक मतदानाचा हक्क बजवताना परिवार सोबत...



उत्सव लोकशाहीचा... राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या प्रक्रियेत सहभागी होऊन लोकशाही बळकट करण्यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी त्यांचे जन्म गाव बाभळवाडी येथे आज मतदानाचा हक्क बजावला. महाराष्ट्राचे भविष्य ठरवण्याची ताकद तुमच्या मतात आहे त्यामुळे सर्वांनी घराच्या बाहेर पडून मतदान करा ..



आ. लक्ष्मण पवार सपत्नीक यानी मतदानाचा हक्क बजावला.



महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांनी दैठण मतदान केंद्रावर मतदान करुन मतदानाचा हक्क बजावला

# दिग्दर्शक, अभिनेते श्री.रामदास राऊत व्यावहारिक जीवनातही प्रगतीशिल !

## दिग्दर्शक, अभिनेते श्री.रामदास राऊत यांचे, ' द बेस्ट सलोन' आता पुण्यातील वाकड येथे !

पाथर्डी (प्रतिनिधी)

दिग्दर्शक, अभिनेते श्री.रामदास राऊत यांचे व्यावहारिक,कौटुंबीक जीवनातही प्रगतीशिल पाऊल नेहमी पडत असते.दिग्दर्शक, अभिनेते असलेले श्री.रामदास राऊत यांचे ,' द बेस्ट सलोन' आता पुण्यातील वाकड येथे सुरू करण्यात आले आहे. दिग्दर्शक, अभिनेते श्री.रामदास राऊत यांच्या नविन सलोन शाखेचे दिनांक १८/२०/२०२४ रोजी पुणे येथील वाकड येथे 'द बेस्ट सलोन'या नावाने उद्घाटन संपन्न झाले आहे. या समारंभप्रसंगी त्यांचा मुलगा रजनीकांत रामदास राऊत यांनी आई-वडिलांच्या हस्ते मान देऊन अर्थात श्री.रामदास बबन व आई





रंजना रामदास राऊत यांना मान देऊन उपस्थितीतांच्या उपस्थितीत या नवीन दुकानाचे उद्घाटन केले.आईवडिलांना प्रथम मान देणारे रजनीकांत रामदास राऊत हे एक सुपुत्र ठरले आहेत. श्री.रामदास राऊत हे सामाजीक कार्यात सदैव तत्पर असतात.

या 'द बेस्ट सलोन' शॉप चे संचालक रजनीकांत रामदास राऊत यांचे वडील रामदास बबन राऊत व आई रंजना रामदास राऊत यांच्या हस्ते या समारंभाचे उद्घाटन करून रजनीकांत यांनी आलेले पाहुणे व इतर मान्यवरांनाही सन्मानित केले. पुणे, वाकडे येथे हे भव्य दिव्य अशा आधुनिक पद्धतीच्या ' द बेस्ट सलोन' या शॉप चे उद्घाटन केले गेले आहे. आलेल्या सर्व पाहुण्यांना राऊत परिवाराचे वतीने सन्मानिते करण्यात आले. सर्व पाहुण्यांनी राऊत परिवाराच्या वतीने' द बेस्ट सलोन' या समूह उद्योगाला सदिच्छा व शुभेच्छा दिल्या. त्यावेळेस फिल्म इंडस्ट्री मधील फिल्म डिरेक्टरी श्री.विक्रमजी थोरात सर ,अमोल काळे ही उपस्थित होते.असंख्य चाहते,मित्र परिवार व फिल्म कलावंत यावेळी उपस्थित होते.श्री. रामदास राऊत सर यांचे शिरूर मध्ये 'साई बिजनेस कोर्ट' येथे 'राऊत मेन्स पार्लर' या नावाने पहिली शाखा २०१२ साली सुरू झाली. त्यानंतर आता पुणे शहरामध्ये वाकड येथे ही दुसरी शाखा सुरू केली आहे. बारा वर्षाच्या तपानंतर ही दुसरी २०२४ ला शाखा सुरू होत आहे.याचे सर्वांनी कौतुक केले आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृष्णकांत रामदास राऊत व पायल कृष्णकांत राउत यांनी केले .

# फराळेच्या ओंकार शुगरचे चार लाख टन गाळप उद्दीष्ट : ओमराजे बोत्रे पाटील

## कारखान्याचा बॉयलर अग्निप्रदीपन व मोळीपूजन कार्यकम संपन्न

कुडूत्री(प्रतिनिधी)

सन २०२४/२५ चालू गळीत हंगामासाठी ओंकार शुगर फराळे कारखान्याच्या वतीने ४ लाख टन गाळपाचे उद्दिष्ट असून सर्व कारखान्याच्या बरोबरीने दर देणार असल्याचे चेअरमन ओमराजे बोत्रे पाटील यांनी दुसरा गळीत हंगाम बॉयलर अग्निप्रदीपन मोळी पूजन सोहळयाप्रसंगी केले. कारखान्याच्या ११ ऊस उत्पादक महिला यांच्या शुभ हस्ते हा ऊस मोळी पूजन सोहळा संपन्न झाला.चेअरमन ओमराजे बोत्रे पाटील,व प्रशांत पाटील यांचा सत्कार ही यावेळी करण्यात आला.

या कार्यक्रम प्रसंगी बोलताना जनरल मॅनजर शत्रुघ्न पाटील म्हणाले आज साखर कारखाने अडचणीत असताना बाबुराव बोत्रे - पाटील यांच्या मार्गदर्शनातून उत्कृष्ट असे कारखान्याचे काम सुरू असून



कामगार पगार,ऊस बिले,तोडणी वाहतूक बिले वेळच्या वेळी दिली जात आहेत. उत्कृष्ट व्यवस्थापणातून कारखान्याचे काम देशपातळीवर गाजत आहे. शेतकरी वर्गाबरोबर कामगारांच्या ही समस्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे सांगितले. मागील वर्षी दिलेल्या शब्दानुसार को - जनरेशन चालू करत असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले.

कार्यक्रमात सदाशिव पाटील शशिकांत कांबळे यांनी आपली मनोगते व्यक्त केलीत.

# भाजपा नेते विनोद तावडेंवर पैसे वाटल्याचा ठाकूरांचा आरोप

## तर तावडेंनी आरोप फेटाळले!

### तावडेंच्या विरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार

मुंबई (प्रतिनिधी)

क्षितीज ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीने (बविआ) भाजपचे राष्ट्रीय सचिव विनोद तावडे यांच्यावर पैसे वाटल्याचा आरोप केला. मुंबईच्या विरार परिसरातील हॉटेल विवांतामध्ये बविआच्या कार्यकर्त्यांनी आज, मंगळवारी तावडेंना घेराव घातला. याप्रकरणी बविआने तावडेंच्या विरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. दरम्यान तावडेंनी हे सर्व आरोप फेटाळून लावत सीसीटीव्ही फुटेज तपासून निष्पक्ष चौकशीची मागणी केलीय.

बहुजून विकास आघाडीने केलेल्या आरोपानुसार आज मंगळवारी विनोद तावडेही विरार येथील मनोरीपाडा येथील हॉटेल विवांत येथे आले होते. यावेळी त्यांच्या सोबत भाजपचे उमेदवार राजन नाईक व काही पदाधिकारी होते. त्यांच्यात बैठक सुरू असतांना बहुजन विकास आघाडीचे काही कार्यकर्ते ही थेट या हॉटेलमध्ये घुसले. यावेळी तावडे हे पैसे वाटत होते. तब्बल ५ कोटी



रुपयांचे वाटप झाल्याचा आरोप बविआने केला आहे. दरम्यान, या कार्यकर्त्यांना भाजप कार्यकर्त्यांनी रोखले. यामुळे दोन्ही गटात तुफान राडा झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी दोन्ही गटातील कार्यकर्त्यांना शांत करत परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. बहुजन विकास आघाडी आणि भाजपच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांविरोधात घोषणाबाजी करत होते.

या प्रकरणी बहुजन विकास आघाडीचे हितेंद्र ठाकूर यांनी विनोद तावडे यांच्यावर गंभीर आरोप केले. ठाकूर म्हणालेत की, विनोद तावडे हे विवांता हॉटेलमध्ये ५ कोटी रुपये घेऊन त्याचे वाटप करत होते. पोलीस हॉटेलमध्ये पोहोचले तेव्हा त्यांना २ डायऱ्या सापडल्या आहेत. आता प्रचार संपला आहे. त्यानंतर देखील विनोद तावडे हे मतदार संघात कसे आहेत? मतदानाच्या ४८ तास आधी बाहेरच्या नेत्यांनी मतदारसंघ सोडायचे असतात, हे त्यांना माहीत नाही का? असे प्रश्न देखील ठाकूर यांनी उपस्थित केले आहेत. दरम्यान, पराभव पुढे दिसत असल्याने असे आरोप विरोधक करत असल्याचा आरोप भाजपचे नेते अतुल भातखळकर यांनी

# आचारसंहितेचा भंग करणाऱ्या शिक्षकांविरोधात गुन्हा दाखल







प्रतिनिधी । बीड

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू आहे. या दरम्यान कोणी आचारसंहितेचा भंग करत असेल तर त्याचा विरोधात कारवाई करण्याची एका पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. एका शिक्षकांने सोशल मिडीयावर उमेदवारासंदर्भात पोस्ट केल्याने सदरील शिक्षका विरोधात कारवाई करण्यात आली आहे.

अशोक सोपान सिरसट हे पारधे वस्ती बोरखेड या ठिकाणी सहशिक्षक म्हणून कार्यरत आहे. त्यांनी अपक्ष उमेदवाराच्या संदर्भात पोस्ट केल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदरील शिक्षका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान ही कारवाई आचार संहिता कक्ष प्रमुख तथा गट विकास अधिकारी अनिरुध्द सानप यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या बाबत गटशिक्षण अधिकारी समंदर हमीद खान यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान आता पर्यंत आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी चार कारवाया करण्यात आल्या.

# जिल्ह्यात येथे कलम १६३ लागू

बीड : भारत निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. सदर कार्यक्रम घोषित के ल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. तसेच विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान प्रक्रिया होणार असून २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे. त्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाची निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मतदान केंद्र व मतमोजणीच्या ठिकाणी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू करण्यात आल्याचे आदेश अपर जिल्हा दंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी निर्गमित केले आहेत.

सदर आदेश निवडणुकीची कामे





हाताळताना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये या दृष्टीकोनातून २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानाच्या दिवशी २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणीच्या दिवशी सकाळी ०६ वाजेपासून ते मतदान प्रक्रिया व मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंमलात राहतील. तसेच प्रत्येक ईसमावर सदर आदेश तामील करणे शक्य नसल्यामुळे हे एकतर्फी आदेश ध्वनीक्षेपकावर पोलिसांनी जाहीर करून त्यास प्रसिद्धी द्यावी, असेही आदेशात नमूद आहे.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मतदान केंद्राच्या ठिकाणापासून १०० मीटर व मतमोजणी केंद्राच्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरातील सर्व पक्ष कार्यालय,

उमेदवारांचे मंडपे, सर्व दुकाने इत्यादी तसेच मोबाईल, कॉडलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे इत्यादींच्या वापरावर बंदी घालण्यात येत आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT